**FYBABED Semester End Examination (Regular/Repeat)**

April / May 2023

**Course Title:** आधुनिक मराठी कविता, उताऱ्यावरील प्रश्न व सारांश लेखन

**Subject:** Marathi **Course Type:** Optional Marathi

**Semester:** II **Duration:** 2 Hours **Max Marks:** 70

---

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.

२. उजव्या हाताकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

३. प्रत्येक नवीन प्रश्नांचे उत्तर नवीन पानावर सुरु करावे.

---

**प्र.१. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** (३×५= १५)

१. कविता या साहित्यप्रकारची कोणतीही तीन वैशिष्ट्ये लिहा.

२. कविता या साहित्यप्रकाराचा कोणताही एक प्रकार स्पष्ट करा.

३. कवियत्री इंदिरा संत स्वतःला अळूचे पान का म्हणतात?

४. 'शिक्षा' या कवितेत इंदिरा संत ह्यांना अपराधीपणाची भावना का येते?

५. सारांश लेखनाच्या कोणत्याही दोन पायऱ्या स्पष्ट करा.

**प्र.२. पुढीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** (३×५= १५)

१. इंदिरा संतांच्या काव्याचे कोणतेही दोन भाषिक विशेष लिहा.

२. 'पावसाची रात्र' या कवितेत इंदिरा संतांनी रात्रीचे वर्णन कसे केले आहे?

३. 'उपसावें उपसावें' या कवितेत इंदिरा संतांनी प्रतिमांचा कसा वापर केला आहे?

४. 'आठवणीतल्या कविता' या कवितासंग्रहाची कोणतीही तीन वैशिष्ट्ये लिहा.

५. उताऱ्यावरील प्रश्न सोडवण्यासाठी भाषेवर प्रभुत्व असणे का महत्त्वाचे असते?

**प्र.३. पुढीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा .** (२×५= १०)

१. " होतें मज एक वेड, एकटीने
दरियावरचे जहाजपक्षी बघण्याचें,
लाटांवर झुलण्याचें...."

२. क्षितिजाशी चंद्रबिंब
काळ्या पाण्याच्या धारेंत
उंचावली लाट माझा
पाय ओढते पाण्यांत.'

३. "आल्या कुण्या देशाहून
काळ्या पाखरांचा थवा
विसावला तारेवर
निळें पाणी निळी हवा."

४. "वळचणीची मैनाराणी
रोज रोज घाली शीळ
आज पहाटे तिची कां
झाली सनई मंजूळ"

**प्र.४. पुढीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.** (२×५= १०)

१. मृगजळ
२. उंबरठ्याशी
३. काय बाई सांगू कथा
४. नाहीस तूं

**प्र.५. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.** (१×१०= १०)

१. आधुनिक कविता म्हणून 'आठवणीतल्या कविता' या कवितासंग्रहाचे मूल्यमापन करा.
२. 'आठवणीतल्या कविता' या कवितासंग्रहातील तुम्ही वाचलेल्या कोणत्याही एका कवितेचा आशय लिहा.

**प्र.६.अ) पुढील पद्य वाचून दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** (१×४= ४)

ओळखलत का सर मला ? पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहुन
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी , बायको मात्र वाचली,
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले,
प्रसाद म्हणून पापण्यांवरती पाणी थोडे ठेवले.
कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे,
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला.
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून, फक्त लढ म्हणा

१. कवितेत नायकाचा संसार का उध्वस्त झाला आहे?
२. प्रसाद म्हणून नायकाच्या पापण्यांवरती काय ठेवले असे कवी सांगतात ?
३. गंगामाई घरात आल्यावर नायकाच्या घराची परिस्थीती कशी झाली आहे?
४. कवितेतील नायकाला एकटेपणा का वाटतो?

**आ) वरील पद्याचे सारांश लेखन करा.** (१×६= ६)

-------------------------------